# ५) वज्ज-परिक्खा

जैन श्रीमाल-धांधिया गोत्रीय, कन्नाणा-निवासी, श्री. ठक्कुर फेरू हे अल्लाउद्दीन खिलजी यांच्या मंत्रिमंडळातील एक अतिशय अनुभवी बहुश्रुत विद्वान व रत्नपारखी होते. त्यांचा मुद्राशास्त्र आणि भारतीय मुद्रांचे विवेचन करणारा 'द्रव्यपरीक्षा' नावाचा ग्रंथ आहे. तसेच 'भूगर्भ-प्रकाश' नावाचा भूगर्भ विज्ञान या विषयावरील ग्रंथ देखील त्यांनी रचला आहे. ठक्कुर फेरू यांनी इ.स.१३१५ मध्ये आपला मुलगा हेमपालासाठी, १३२ गाथांचा, 'रयण-परिक्खा' नावाचा ग्रंथ, प्राकृतमध्ये लिहिला. या ग्रंथामध्ये अनेक रत्नांबरोबर त्यांनी सुरवातीस वज्र (हिरा) या रत्नाविषयीची लक्षणे, फळ आदि माहिती उत्तम रीतीने दिली आहे.

हेमंत-सूरपारय-कलिंग,-मायंग-कोसल-सुरट्ठेसु।
पंडुर-विसएसु तहा वेणु,-णईए वज्ज-ठाणाइं।।१।।

तंब-सिय-णील-कुक्कुस,-हरियाल-सिरीस-कुसुम-घणरत्ता।
इय वज्ज-वण्ण-छाया, कमेण आगर-विसेसाओ।।२।।

परं विसेसोऽयं -
कोसल-कलिंग-पढमे, दुइए हेमंते तह मायंगे।
पंडुर-सुरट्ठ-तईए, वेणुज-सोपारय-सेसे।।३।।

छक्कोणअट्ठफलहा, बारस-धारा य हुंति वज्जा य।
अट्ठगुणा णव-दोसा, चउछाया चउरवण्ण-कमा।।४।।

सम-फलह-उच्च-कोणा, सुतिक्ख-धारा य वारितर-अमला।
उज्जल-अदोस-लहुतुल, इय वज्जे होंति अट्ठ-गुणा।।५।।

काग-पग-बिंदु-रेहा, सामला फुट्टा य एग-सिंगा य।
वट्टा य जवाकारा, हीणाहिय-कोण-णव-दोसा।।६।।

चत्तारि वि वण्णा तह, पियारुणा णरवराण रिद्धि-करा।
सेसा णिय-णिय-वण्णे, सुहंकरा वज्जा णायव्वा।।७।।

लच्छीए आयड्ढी थंभइ, अरिणो परक्कमं समरे।
तेण अरुणं पीयं, णरेसरो धरइ वर-वज्जं।।८।।

जह दप्पणेण वयणं, दीसइ तह उत्तमेण वज्जेण।
णर-तिरिय-रुक्ख-मंदिर,-तहिंदधणुहाइं दीसंति।।९।।

समपिंड-सगुण-णिम्मल,-गुरुतुल्ला हीणपिंड-लहुमुल्ला।
फार-लहुतुल्ल-वज्जा, बहुमुल्ला सम-समा मुल्ला।।१०।।

वज्जं लहु-फलह-सिरं, वित्थर-चरणं तिलोवरिं काउं।
जो जडइ अह जडावइ, तस्स धुवं हवइ बहु-दोसं।।११।।

वज्जेण सव्वे रयणा, वेहं पावंति हीरए हीरा।
कुरुविंदो पुण वेहइ, णीलस्स ण अण्ण-रयणस्स।।१२।।

अयसार-कच्च-फलिहा, गोमेयग-पुंसराय-वेडुज्जा।
एयाउ कूड-वज्जा कुणंति, जे होंति कल-कुसला।।१३।।

कूडाण इय परिक्खा, गुरु-विण्णाया सुहुम-धारा य।
साणायं सुह-घसिया, दुह-घसिया रयण-जाइ-भवा।।१४।।

## सद्दत्था

**हेमंत** – हिमालयाचा प्रदेश, तिसऱ्या श्लोकात हिरे (वज्र) जेथे सापडतात त्या सर्व प्रदेशांची नावे दिली आहेत. परंतु वैशिष्ट्य असे की, पहिल्या प्रकारचे हिरे कलिंग देशात तर दुसऱ्या प्रकारचे हिरे हेमंत व मातंग प्रदेशात सापडतात.

**वेणुणई** – वेण्णानदी (ही नदी मराठवाडा-विदर्भ या प्रदेशात आहे)

**हरियाल** – पिवळ्या वर्णाचा

**परं विसेसोऽयं** – परंतु विशेष असे की

**सूरपारय/सोपारय** – सोपारक/शूर्पारक नावाचा देश (जो सध्या नालासोपारा या नावाने प्रसिद्ध आहे)

**वज्जठाणाइं** – हिऱ्याच्या खाणी

**कुक्कुस** – धान्यादीचे फोलपट (तशा प्रकारचा रंग)

**घण** – अत्यंत, प्रगाढ

**आगर** – खाण

**वारितरअमला** – पाण्यापेक्षाही निर्मळ

**अदोस** – निर्दोष

**कागपग** – कावळ्याचा पाय

**वट्ट** – गोलाकार, वर्तुळ

**सिय** – शुभ्र, धवल

**विग्घ** – संकट

**रिद्धि** – वैभव

**णायव्वा** – जाणावेत

**आयड्ढी** – आकर्षण

**वेह** – छेद, वेधन

**कूड** – खोटे

**फलह** – हिऱ्याचे समतल पृष्ठभाग

**चप्पडि** – चपटे

**समपिंड** – समान गुणधर्म (वजन व आकार)

**जडइ, जडावइ** – (जो हिरे) जडवितो व जडवून घेतो

**कुरुविंदो** – या नावाचे रत्न

**वेहइ** – वेध घेतला जातो. भावार्थ – रत्न हिऱ्याने कापता येते; हिरा हिऱ्याने कापता येतो पण निळा हिरा मात्र ‘कुरुविंद’ नावाच्या हिऱ्यानेच कापता येतो

**अयसारकच्च... होंति कलकुसला** – अयसार(लोहभस्म), काच, स्फटिक, गोमेदक, पुष्कराज व वैडूर्य यांपासून कृत्रिम रत्ने कलाकुशल कारागीर तयार करू शकतात

## सज्झाओ

**१) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ज्यामुळे मोठा दोष लागतो अशा हिऱ्याचे वर्णन करा.


**२) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) हिऱ्याच्या खाणी असणाऱ्या प्रदेशांची नावे सांगा.
२) हिऱ्याच्या प्रकाराची नावे सांगा.
३) हिऱ्याचे गुणदोष सांगा.
४) हिरा ओळखण्यासाठी असणारे निकष तुमच्या शब्दांत मांडा.


**३) पाठात हिऱ्यासाठी आलेल्या उपमा तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**४) पाठातील शब्द निवडून रेखाचित्र पूर्ण करा.**


१)




२)




३)




**५) शब्द निवडून तक्ता पूर्ण करा.**

हेमंत, बारस-धारा, कागपग, सूपारय, कलिंग, कोसल, हीणाहिय-कोण, अमला, फुट्टा

| गुण | दोष | जागा |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**६) हिरेपारख्यांना भेटून आधुनिक रत्नपरीक्षा कशी केली जाते याबद्दल प्रकल्प तयार करा.**